दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३०५ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353


# भारतातील पहिला 'म्युझिकल रोड' मुंबईत!

## कोस्टल रोडवर धावताना ऐकू येणार 'जय हो'ची धून; पाहा खास वैशिष्ट्ये

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज किनारी मार्गावर (मुंबई कोस्टल रोड) वाहनचालकांसाठी एक आगळावेगळा आणि अभिमानाचा अनुभव देणारी अभिनव संगीत संकल्पना तयार करण्यात आली आहे. या रस्त्यावर विशेष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. या संगीत मार्गावरील (मेलोडी रोड) पट्ट्यांवरून वाहन गेल्यावर स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील 'जय हो' या गाण्याची धून कानी पडेल. जगातील पाचवा आणि भारतातील पहिलाच प्रयोग असलेल्या या प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बुधवारी लोकार्पण करण्यात आले.

वरळीकडे जाणाऱ्या भूमिगत बोगद्यातून बाहेर पडल्यानंतर दुभाजकाला लागून असलेल्या पहिल्या



मार्गिकेवरून ५०० मीटर पुढे संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. या पट्ट्यांवरून ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वाहन नेल्यास 'जय हो' या गीताची धून ऐकू येते. रस्त्याच्या पृष्ठभागावर ठराविक अंतरावर आणि विशिष्ट आकारात संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. वाहन ठराविक वेगात या पट्ट्यांवरून गेल्यावर चाकांच्या घर्षणातून निर्माण होणाऱ्या ध्वनीलहरींवर 'जय हो' गाण्याची धून बसविण्यात आली आहे. हे स्वर त्या वाहनातील प्रवाशांना ऐकू येतील.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत तंत्रज्ञान, भारतीय संस्कृती आणि संगीताचा सुंदर मिलाफ म्हणून संगीतमय रस्ता देशभरात कुतूहलाचा विषय ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. दरम्यान, यानंतरही अशाप्रकारे संगीत मार्ग साकारण्यात येतील. समृद्धी महामार्गावरही प्रायोगिक तत्त्वावर ही संकल्पना राबविण्याचा विचार करू. मुंबई किनारी रस्त्यावर साकारलेला संगीत मार्ग मुंबईकरांच्या मनात देशभक्ती जागृत करणारा आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी वाहनात बसून 'स्लमडॉग मिलेनियर' या चित्रपटातील 'जय हो' या गीताची धून ऐकत संगीत मार्गाचा आनंद घेतला. लोकार्पण सोहळ्याला हंगेरीचे वाणिज्य दूत फॅरेन जारी, माजी खासदार राहुल शेवाळे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे आदी उपस्थित होते.

ही संकल्पना केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून, आधुनिक अभियांत्रिकी आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचा अनोखा संगम आहे. महानगरपालिकेने उभारलेल्या धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज किनारी रस्ता हा मुंबईच्या आधुनिक पायाभूत सुविधांचे प्रतीक मानला जातो. आता 'जय हो'ची धून अनुभवता येणारा हा रस्ता मुंबईच्या सांस्कृतिक आणि देशभक्तीपर ओळखीमध्ये आणखी भर घालणारा ठरणार आहे.

**असा आहे 'संगीत'/मेलडी रोड'**

रस्त्यावर ठराविक अंतरावर व विशिष्ट मोजमापात पट्टे तयार केले आहेत. वाहन ठराविक वेगात त्या पट्ट्यांवरून गेले, की चाकांच्या घर्षणातून संगीतासारखा ध्वनी निर्माण होतो. यालाच 'म्युझिकल रोड' किंवा 'मेलडी रोड' असे म्हटले जाते. भूमिगत बोगद्यात वाहन असतानाच चालकांना संगीतमार्गाची माहिती व्हावी, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून ५०० मीटर, १०० मीटर आणि ६० मीटर अंतर आधीच संगीत मार्गाबाबतचे सूचनाफलक लावण्यात आले आहेत.

**भारतातील पहिलाच प्रयोग**

या अभिनव संकल्पनेचा प्रसार २००७ मध्ये जपानमध्ये झाला. जपानमधील अभियंता शिझुओ शिनोडा यांनी बुलडोझरच्या साहाय्याने रस्त्यावर काम करताना हा ध्वनी परिणाम शोधून काढला. पुढे याच प्रयोगातून 'मेलडी रोड' ही संकल्पना विकसित झाली. आतापर्यंत हंगेरी, जपान, दक्षिण कोरिया, संयुक्त अरब अमिराती येथे असे प्रयोग करण्यात आले आहेत. भारतातील हा पहिलाच प्रयोग आहे.

## १२ वीच्या परीक्षार्थीच्या मृत्यूनंतर प्रवासी संघटनांचे निषेध आंदोलन

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** मध्य रेल्वे मार्गावरील कळवा आणि मुंब्रा स्थानका दरम्यान मंगळवारी सकाळी इयत्ता १२ वीचा परीक्षार्थी सोहम कठरे (१८) याचा परीक्षा केंद्रावर जाताना प्रवासात तोल गेल्याने मृत्यू झाला होता. या अपघातानंतर संतापलेल्या प्रवासी संघटनांनी बुधवारी काळे कपडे परिधान करत सरकारचा निषेध व्यक्त केला. तसेच ठाणे रेल्वे स्थानकाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर सोहम याला श्रद्धांजली वाहिली.

सोहम हा इयत्ता १२ वीमध्ये शिकत होता. परीक्षेचा पहिला पेपर असल्याने तो परीक्षा देण्यासाठी कळवा येथील परीक्षा केंद्रावर निघाला होता. मंगळवारी सकाळी जखमी अवस्थेत कळवा आणि मुंब्रा रेल्वे स्थानका दरम्यान रेल्वे रुळांजवळ तो आढळून आला. सोहम याला पोलिसांनी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात




उपचारासाठी दाखल केले. परंतु दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सोहम याचा रेल्वेच्या गर्दीमुळे तोल जाऊन मृत्यू झाल्याचा आरोप करत बुधवारी प्रवासी संघटनांनी सरकारविरोधात निषेध आंदोलन केले. प्रवासी संघटनांच्या प्रतिनिधींनी काळे कपडे परिधान करत सरकारचा निषेध केला. तसेच ठाणे रेल्वे स्थानकाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ सोहम याला श्रद्धांजली

## पालघर शहरात डावीकडे वळण्यासाठी मोकळे रान, फ्री लेफ्ट साठी नगर परिषदेच्या हालचाली

महाराष्ट्र जीत

**पालघर :** पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालयाचे ठिकाण झाले असून शहरात होणाऱ्या विविध चौकांमधील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून वाहनांना डावीकडे सहजगत वळण्यासाठी मोकळी जागा व व्यवस्था उभी करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने ठराव घेतला असून या दृष्टीने उपाययोजना आखण्यासाठी विविध विभागाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन केले आहे.

पालघर शहरात असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वीर सावरकर चौक, हुतात्मा स्तंभ (पाचबत्ती) तसेच स्टेट बँकेसमोर असणारे वळण या ठिकाणी




मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. काही चौकांमध्ये सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली असून ती प्रभावहीन ठरली आहे.

शहरातील या चौकांमध्ये काही ठिकाणी झालेले कायमस्वरूपी अतिक्रमण तर काही ठिकाणी असणाऱ्या हातगाड्या व इतर विक्रेत्यांना बाजूला हटविणे, डावीकडे वळण्यासाठी अडथळे ठरत असणारी झाडे, विद्युत वाहिनी स्थलांतरित करणे, गटार बंदिस्त करणे, सिग्नल यंत्रणा काढून ठेवणे तसेच बॅनरचे आधार खांब (पोल) व इतर अडथळे दूर करण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ठराव संमत केला आहे.या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वाहतूक पोलीस, पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण कंपनी व इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त पाहणी करून बैठकीचे आयोजन करून या संदर्भात उपाय योजना आखण्यात येतील असे नगराध्यक्ष उत्तम घरत यांनी लोकसत्ता ला सांगितले. चौकामधील अडथळे दूर करून बहुतांश ठिकाणी डावीकडे वळण्यासाठी मोकळीक मिळाल्यास ते नागरिकांच्या व वाहन चालकांच्या सोयीचे ठरेल असेही त्यांनी सांगितले. पालघर शहराचे प्रवेशद्वार असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या रुंदीकरणाबाबत जिल्हा नियोजन समिती मधून ७५ लाख रुपये प्राप्त झाले असून या चौकात प्रत्येक बाजूला किमान पाच मीटर रुंदीकरणाची आखणी करण्यात आली आहे. या संदर्भात निविदा काढण्यात येत असून हे काम मार्च अखेरीपूर्वी करण्याचे उद्दिष्ट नगरपरिषदेने ठेवले आहे.शहरातील मुख्य रस्त्यांवर नगरपरिषदेने नो हॉकर झोन क्षेत्र निश्चित केले आहे. या क्षेत्रांमध्ये बसणारे फळभाजी विक्रेते, मासळी विक्रेते यांना मर्यादित ठिकाणी बसण्याची मुभा देण्यात येणार असून त्यासाठी नगरपरिषद त्या क्षेत्राचे सीमांकन करणार आहे.

## तारण ठेवलेले १ कोटी ४४ लाखांचे सोने घेऊन सोनार फरार, आंदोलने निदर्शने केल्यावर गुन्हा दाखल

महाराष्ट्र जीत

**नवी मुंबई :** कोपरखैराणे सेक्टर १९ बी येथील महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दोन भागीदारांनी २७ जणांनी तारण ठेवलेले ९८८ ग्रॅम सोने घेऊन दुकान बंद करून पळ काढला आहे. २७ जानेवारी पासून दुकान बंद असून त्याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी फिर्यादी करीत आहेत. यासाठी किमान पन्नास पेक्षा जास्त वेळा कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवले गेले. शेवटी आंदोलन केल्यावर पोलिसांना जाग आली आणि त्यांनी या प्रकरणी महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दोन भागीदारांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.रुपेश गुज्जर आणि सुरेश




या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या दोघांनी भागीदाराची कोपरखैरणे सेक्टर १९ बी येथील रांजना देवी प्रसन्न इमारतीत गेला क्रमांक तीन येथे महालक्ष्मी ज्वेलर्स नावाचे दुकान त्यांनी १५ वर्षांपूर्वी सुरु केले होते. या ठिकाणी त्यांची अनेक वर्षांपासून ओळख असलेले गुलचंद चौहान यांनी २५ सप्टेंबरला दागिने गहाण ठेवत ८ लाख रुपयांचे कर्ज घेतले. त्या पैकी चार लाख रुपये ३० ऑक्टोबर पर्यंत फेडण्यात आले. जेवढे पैसे फेडले तेवढ्या किमतीचे दागिने परत मागितले असता त्यांनी टाळाटाळ सुरु केली. ३ फेब्रुवारी पासून दुकानात फेऱ्या मारणे सुरु झाले मात्र दुकान कायम बंद होते. त्यावेळी परिसरात विचारणा केली असता २२ जानेवारी पासून दुकान उघडले गेले नसल्याचे समोर आले असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

ही माहिती हळू हळू अनेकांना कळली. अशा सुमारे तीस जणांनी तीन ते चार तारखेपासून महालक्ष्मी ज्वेलर्स विरोधात तक्रारी करणे सुरु केले.मात्र त्यांच्या विरोधात कोपरखैरणे पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ करणे सुरु केले . दबाव वाढल्यावर पोलिसांनी अगोदर अर्ज करा असे फर्मान सोडले त्यामुळे या बाबत चार तारखेला काही फिर्यादींनी अर्ज दाखल केला. मात्र तरीही पोलिसांनी काहीही हालचाल न केल्याने कोपरखैरणे पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उमटले गेले.

## अंबरनाथमधील बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तरुणाला दहा वर्षाचा कारावास, कल्याण न्यायालयाचा मोठा निकाल

महाराष्ट्र जीत

**कल्याण :** अंबरनाथमधील एका बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या एका तरूणाला कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध (पॉक्सो) न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश व्ही. ए. पत्रावळे यांनी दहा वर्ष सश्रम कारावास आणि १२ हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली. ही दंडाची रक्कम पीडित बालिकेला देण्याची आणि शासनाच्या विशेष योजनेचा लाभ देण्याचे न्यायालयाने सरकार पक्षाला सूचित केले.धोंडिराम तुकाराम बनसोडे (३५) असे कारावासाची शिक्षा झालेल्या इसमाचे नाव आहे. तो अंबरनाथमधील आंबेडकर भागात आपल्या कुटुंबीयांसह राहत होता. त्याच्यावर कट रचून गुन्हेगारी कृत्य करणे, आळीपाळीने लैंगिक अत्याचार करणे या कलमांतर्गत अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सप्टेंबर २०१६ मध्ये हा



लैंगिक अत्याचाराचा प्रकार उघडकीला आला होता.

याप्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील कदम्बिनी भामरे पाटील, विशेष सरकारी वकील आर.आर. भोईर यांनी काम पाहिले. सरकार पक्षातर्फे या प्रकरणात एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीतर्फे या प्रकरणात आरोपीचा कसा सहभाग नाही. गुन्हा घडल्यानंतर दोन दिवस उशिराने याप्रकरणी प्राथमिक तपासणी अहवाल दाखल करण्यात आला, असा प्रतिवाद करण्यात आला. पण न्यायालयाने त्यांचे मुद्दे फेटाळून लावले. दाखल गुन्हा, पोलिसांनी केलेला चौकशी अहवाल, उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी धोंडीराम बनसोडे याला सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

## उपनगरीय क्षेत्रातील गाड्यांची नियमितता राखणे बाबर रेल्वे मंत्री सूचना करणार

महाराष्ट्र जीत

**पालघर :** डहाणू रोड ते विरार दरम्यानच्या पट्ट्यात विलंबाने धावणाऱ्या लोकल व मेमु च्या बाबतीत आढावा घेऊन योग्य त्या सूचना करणार असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार डॉ. हेमंत सवरा यांना आश्वासित केले आहे. पालघर लोकसभा क्षेत्रातील रेल्वे प्रवाशांना दिलासा देण्यासाठी खासदार डॉ. हेमंत सवरा यांचा रेल्वेमंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी भेट घेतली. या प्रसंगी त्यांनी , काही उपनगरीय सेवांच्या वेळेत बदल करणे, लांब पल्ल्यांच्या गाडयांना नव्याने थांबे देणे आदींचा समावेश होता.

पालघर चे खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांनी पालघर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी आणि रेल्वे सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदने दिली आहेत. या भागातील नोकरदार वर्ग, विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी त्यांनी मागण्या केल्या असून रेल्वे मंत्री यांनी सकारात्मकता दाखविल्याचे सांगण्यात आले आहे.

**लोकल गाड्यांचा उशीर व साइडिंग (Siding) थांबवणे:**

डहाणू-विरार मार्गावरील लोकल आणि मेमू गाड्यांना मेल/ एक्सप्रेस गाड्यांना पास देण्यासाठी २०-३० मिनिटे साइडिंगला (बाजूला) उभे केले जाते. यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची प्रचंड गैरसोय



होते. विशेषतः पीक अवरमध्ये (गर्दीच्या वेळी) लोकल गाड्यांना प्राधान्य देऊन त्यांचा वक्तशीरपणा सुधारावा, अशी आग्रही मागणी डॉ. सवरा यांनी केली आहे.

**डहाणू लोकल च्या वेळेत बदल (पहिली लोकल):**

डहाणू रोडवरून सुटणारी पहिली लोकल सध्या पहाटे ४:४० वाजता आहे. ती ५:१६ वाजता पालघरला पोहोचते, परंतु क्रॉसिंगमुळे तिला अनेकदा उशीर होतो. त्यामुळे चाकरमान्यांना कार्यालयात पोहोचण्यास विलंब होतो. या समस्येवर तोडगा म्हणून पहिली लोकल पहाटे ४:४० ऐवजी ४:०० वाजता सोडावी, जेणेकरून ती सकाळी ६:१५ पर्यंत चर्चगेटला पोहोचेल, अशी विनंती खासदारांनी केली आहे.

**पालघर स्थानकावर महत्त्वाच्या गाड्यांना थांबा मिळण्याबाबत:**

पश्चिम रेल्वेने काही गाड्यांच्या थांब्यासाठी तांत्रिक व्यवहार्यता (Feasibility) मान्य केली असून, खासदार डॉ. सवरा यांनी खालील गाड्यांना पालघर स्थानकावर लवकरात लवकर थांबा देण्याची मागणी केली आहे:

१२९३५/३६ वांद्रे- सुरत इंटरसिटी एक्सप्रेस

२०९४१/४२ वांद्रे- गाजीपूर एक्सप्रेस

१२९७१/७२ वांद्रे- भावनगर एक्सप्रेस

१२००९/१० मुंबई सेंट्रल- अहमदाबाद शताब्दी एक्सप्रेस (वाढवण बंदर आणि प्रस्तावित विमानतळामुळे वाढणारे महत्त्व लक्षात घेता).

**डहाणू रोड स्थानकावर एक्सप्रेस गाड्यांना थांबा:**

डहाणू रोड हे एक प्रमुख स्थानक असूनही काही सुपरफास्ट गाड्या येथे थांबत नाहीत. त्यामुळे खालील गाड्यांना डहाणू रोड येथे थांबा देण्याची मागणी करण्यात आली आहे: गाडी क्र. १२९७१/७२ (वांद्रे-भावनगर सुपरफास्ट एक्सप्रेस): दोन्ही बाजूंनी ये-जा करताना.गाडी क्र. १९०२० (देहरादून एक्सप्रेस): सध्या ही गाडी केवळ देहरादूनकडे जाताना थांबते, ती परतीच्या प्रवासात (वापसी दिशा) सुद्धा डहाणू रोडला थांबवावी.

**विशेष गाड्यांचे (Special Trains) नियमितीकरण:**

सध्या तात्पुरत्या स्वरूपात चालणाऱ्या विशेष गाड्या (०९०५५/०९०५६ आणि ०९०३५/०९०३६) या प्रवाशांसाठी जीवनवाहिनी ठरल्या आहेत. प्रवाशांची वाढती गर्दी पाहता, या गाड्यांचे विलीनीकरण करून त्यांना एकच नियमित दैनिक गाडी (Daily Train) म्हणून चालवावे आणि त्यांना 'जनरल भाडे' लागू करावे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना आर्थिक दिलासा मिळेल.

## संपादकीय

### शंभर 'धागे' दु:खाचे!

आयुष्यात खरे सुख हे आपल्या घरात काय आहे यापेक्षा शेजारच्याच्या घरात काय नाही यात आहे हे पुलंनी सांसारिक व्यक्तीबद्दल लिहिलेले सत्य देशाच्या पातळीवरही तसेच्या तसे लागू होते. हे सुख भारतास सतत मिळत राहील याची खबरदारी पाकिस्तान कायम घेत असतो. परंतु हा आनंद आपणास चीनकडून मात्र मिळत नाही. आताही अमेरिकेने आपल्याशी केलेल्या व्यापार करारामुळे आपणास काय मिळणार यापेक्षा पाकिस्तान आणि काही अंशी चीनला काय नाकारले जाणार हे सत्य आपल्या आनंदाचे निधान होते. त्यातही इस्लामधर्मीय पाकिस्तानकडे ढुंकून न पाहता अमेरिकेने आपल्याशी करार केला याचा आनंद तर अवर्णनीयच. तो साजरा करण्यास नुकतीच कोठे सुरुवात झालेली आहे. संसदेतील सत्कार, वर्तमानपत्रांत उद्योगांकडून सत्ताधीशांचे आभार मानणाऱ्या जाहिराती, कथित आणि 'तटस्थ' परराष्ट्र संबंध विश्लेषकांकडून या कराराचे महत्त्व विशद करून सांगणारे लेख... इत्यादी इत्यादी! वास्तविक अमेरिका आणि भारत यांच्यात झालेला करार अंतिम नाही. अंतरिम आहे. परंतु एकदा का प्रत्येक पाऊल जणू अंतिम विजयाचे असे मानून ते साजरे करायचेच असे ठरवले की अंतिम, अंतरिम असल्या क्षुद्र बाबी उत्सवाच्या आनंदोत्सवास गालबोट लावू शकत नाहीत. तथापि 'पाकिस्तानला नाही' या आपल्या आनंदास आता बांगलादेशाकडून ग्रहण लागेल अशी परिस्थिती निर्माण होताना दिसते. निमित्त : भारताशी केलेल्या हंगामी कराराची शाई पूर्णपणे वाळायच्या आत अमेरिकेने बांगलादेशाशी केलेला व्यापार करार. एरवी बांगलादेशाशी कोणी करार केला म्हणून आपली झोप उडण्याचे कारण नाही. पण या कराराचा थेट परिणाम भारतावर होणार असून त्यामुळे त्याची दखल घेणे अत्यावश्यक ठरते.

भारताशी करार करताना अमेरिकेने आपल्या उत्पादनांवर १८ टक्के आयात शुल्क आकारण्यास मान्यता दिली. हा नीचांक. अमेरिकेने इतकी सवलत अन्य कोणालाच दिलेली नाही हा आपला दावा त्यामुळे खरा ठरतो. नुकत्याच झालेल्या करारानुसार बांगलादेशी उत्पादनांवर अमेरिका १९ टक्के इतके आयात शुल्क आकारेल. म्हणजे आपल्यापेक्षा एक टक्का अधिक. पण त्याच वेळी उभय देशांनी परस्परांच्या अनेक उत्पादनांवर शून्य टक्के आयात शुल्क आकारण्यास मान्यता दिली. ही अमेरिकेने आपल्या शेजारी देशास दिलेली विशेष सवलत. ती आपणास नाही. ''बांगलादेशात तयार झालेल्या काही वस्त्रोद्योग उत्पादनांवर अमेरिकेत शून्य टक्के कर आकारला जाईल, अशी नियामक व्यवस्था निश्चित केली जात आहे'', असे अमेरिका या संदर्भात म्हणते. याचा अर्थ बांगलादेशात तयार झालेले कपडे अमेरिकेत करमुक्त विकले जाणार. याचाच दुसरा अर्थ भारतीय कपड्यांवर अमेरिकेत कर आकारला जाणार आणि बांगलादेशी कपडे मात्र करमुक्त असल्याने आपल्या तुलनेत अधिक स्वस्तात विकले जाणार. ही बाब इथेच संपत नाही. या कराराच्या जाहीर झालेल्या तपशिलानुसार बांगलादेश यापुढे अमेरिकेत तयार झालेले कापड खरेदी करेल. नैसर्गिक कापसापासून (कॉटन) अथवा मानवनिर्मित सुतापासून बनलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या कापडांवर बांगलादेशात आयात शुल्क आकारले जाणार नाही. म्हणजे अमेरिकी कापड बांगलादेशात करमुक्त असेल आणि या कापडातून तयार झालेले कपडे अमेरिकेत करमुक्त असतील. म्हणजे बांगलादेशास दुहेरी फायदा. कच्चा मालही करमुक्त आणि अंतिम उत्पादनावरही कर नाही. फायदाच फायदा.

परंतु यामुळे आपल्या पोटात दुखायचे कारण काय? या प्रश्नाचे उत्तर अधिक वेदनादायी. आतापर्यंत बांगलादेश हा भारतीय कापडाचा सर्वात मोठा ग्राहक राहिलेला आहे. कापडापासून कपडे बनवणारे महाप्रचंड शिलाई कारखाने बांगलादेशात असून त्यात लाखांनी महिला काम करतात. पाश्चात्त्य देश असोत वा भारतादी अन्य. बहुसंख्य देशांत विकले जाणारे तयार कपडे हे 'मेड इन बांगलादेश' असे असतात. हे कपडे भले बांगलादेशात शिवले गेले असतील. ते ज्यांतून शिवले जातात ते कापड भारतीय अथवा चीनमध्ये तयार झालेले असते.

## जेव्हा प्राथमिक शाळा आठवू लागते

महाराष्ट्र जीत

आजही गावी गेल्यानंतर शाळेच्या समोरच्या रस्त्यावरून जाताना नकळत शाळेकडे लक्ष जातं आणि ते सगळं बदललेलं पाहून आमची ती प्राथमिक शाळा आठवू लागते. ही गोष्ट आहे ऐंशीच्या दशकातील माझ्या शाळेची. त्याकाळी आजच्यासारखे मुलांच्या पालकांना अॅडमिशनचे कौतुक नव्हते. जूनमध्ये शाळा सुरू झाल्या की गुरुजी घरोघरी जाऊन मुलांचा शोध घेत असत. चार ते सात वयोगटातील मुलांची जन्मतारीख १ जूनच असायची. घरी येऊन नाव नोंदणी केली की झालं अॅडमिशन. फी नाही की युनिफॉर्म नाही, कुठल्या कटकटी नाहीत. कापडाच्या पिशवीत एक पाटी-पेन्सिल टाकली की झालं दप्तर.

असंच माझं अॅडमिशन वयाच्या पाचव्या वर्षी इयत्ता पहिलीत झालं. काकांचा मुलगा माझ्यापेक्षा वयाने सहा महिन्यांनी मोठा होता. त्याचं आणि माझं अॅडमिशन एकाच दिवशी झालं आणि शाळा सुरू झाली. गावातील मारवाड्याच्या वाड्यात आमची शाळा भरत असे. तो चौकाचा वाडा आजही आठवतो. मोठ्या तीन खोल्यांत तीन वर्ग बसत असत. पहिली आणि बालवाडी एकत्र, दुसरी-तिसरी एकत्र आणि चौथी एकत्र या तीन वर्गांना शिकवण्यासाठी तीन शिक्षक असत. पहिल्या दिवशी वडील शाळेत सोडायला आले. त्यांनी बाईंच्या हवाली आम्हा दोघांना केले. बाईंनी अंगावरून मायेने हात फिरवला. त्याच क्षणी शाळेची भीती क्षणात पळून गेली. आमच्या नर्मदाबाई साक्षात दुसऱ्या सावित्रीबाईच. पांढऱ्या रंगाची प्रिंटेड नऊवारी साडी नेसलेल्या, डोक्यावरून पदर. छान कपाळावर कुंकू आणि प्रेमळ चेहरा. त्यांनी सर्वांना रांगेत प्रार्थनेसाठी बसवलं. समोरच गुरुजी उभे होते. सहा फूट उंच, गोरापान रंग, लांब नाक आणि कायम चेहऱ्यावर स्मित रेषा. नर्मदाबाई आणि तुळशीराम गुरुजी यांची जोडी लक्ष्मीनारायणासारखी शोभून दिसत असे. पांढराशुभ्र शर्ट, पायजमा, डोक्यावर टोपी घातलेले तुळशीराम गुरुजी समोर येऊन मांडी घालून बसले आणि 'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना सुरात म्हणायला सुरुवात केली. त्यांच्या पाठीमागे आम्ही म्हणू लागलो, अशाप्रकारे शाळेचा पहिला संस्कार त्या दिवशी रुजला. प्रार्थनेनंतर बाईंनी सर्वांना पाटी-पेन्सिल काढायला सांगितली आणि मुलांच्या जवळ बसून हातात हात घेऊन बाईंनी पाटीवर श्री गणेशा गिरवून घेतला.

आमच्या शाळेची वेळ सकाळी ७ ते ११ आणि दुपारी २.३० ते ५ अशी असे. आदल्या दिवशी रात्रीच आई तेल लावून घट्ट दोन वेण्या घालून झोपताना डोक्याला कपडा बांधून ठेवत असे. सकाळी उठल्यानंतर तोंड धुवून दूध पिलं की शाळेत जायची घाई होत असे. दुपारी मात्र शाळेत जाऊन बसलं की डुकली यायची. बाईंचे लक्ष गेले की त्या आतल्या रूममध्ये घेऊन जायच्या आणि तिथे सतरंजीवर झोपवायच्या. दुपारची शाळा अर्धी झोपेतच गेली. दुसरीला गेले तेव्हा गावाच्या बाहेर एका छोट्या टेकडीवर प्राथमिक शाळा होती. त्या शाळेला मोठं अंगण होतं. हिवाळ्यात शाळेच्या पटांगणात शाळा



भरायची, तर उन्हाळ्यात झाडाखाली. पावसाळ्यात शाळेच्या पत्र्यावर नाचत येणारा पाऊस हवाहवासा वाटायचा. आमच्यासारखाच झाडावर पक्ष्यांचाही चिवचिवाट असायचा. मोकळ्या हवेत, निळ्याशार आकाशाच्या मंडपाखाली असलेली शाळा. कधी चौथी संपली समजलेही नाही. बऱ्याच जणांच्या पायात चप्पलही घातलेली नसायची. मुलं शाळेकडे धावत सुटायची. रस्त्यावर दगड धोंडे असायचे. कित्येक वेळा ठेच लागून पडलं की गुडघे फुटायचे. जखमेवर फुंकर मारून पुन्हा उठायचे आणि शाळेकडे धावायचे. मध्येच शेळ्या, गुरं, तर कधी डोक्यावर शेणाची टोपली किंवा विहिरीवरून पाणी आणणाऱ्या बायका भेटायच्या, तसेच गावातील पुरुष मंडळी पारावर बसलेली असायची. गावातील सर्वच काका-काकू, मामा, मावशी अशा नात्यांनी जोडलेली असायची. त्यामुळे प्रत्येक जण बोलायचे, खुशहाली विचारायचे. हे सर्व पार करत शाळेत पोहोचेपर्यंत प्रार्थनेची वेळ व्हायची. सर्व शाळेतील मुले पटांगणात एकत्रच प्रार्थनेसाठी जमा होत असत. राष्ट्रगीत जन गण मन, भारत माझा देश आहे या दोन प्रार्थना सुरू झाल्या की आजूबाजूचा सारा परिसर त्या प्रार्थनेत सामावलेला असे. प्रार्थनेमुळे शिस्त, देशप्रेम, आपुलकी या भावना आपोआप रुजल्या जात असत. शाळेत सर्व उत्सव साजरे केले जात असत. २६ जानेवारी, १५ ऑगस्टला दोन-तीन दिवस आधीपासून तयारी सुरू असायची. शाळेतील मुलेच सर्व तयारी करत असत. जी मुलं चुणचुनी बोलकी असायची त्यांच्याकडून शिक्षक भाषण पाठ करून घेत असतात. पहिलं व्यासपीठ दुसरीच्या शाळेत असताना मिळालं. त्या काळातील शिक्षक म्हणजे केवळ शिकवणारे फक्त मास्तर नव्हते, तर ते मार्गदर्शक, पालकही होते. वेळप्रसंगी शिक्षाही करायचे आणि चांगले काही केले तर कौतुकाची थाप मारून शाब्बासकीही द्यायचे.

आमचे शिक्षक गणिताचे पाढे, मराठीची कविता तालात म्हणत असल्यामुळे कविता लगेच पाठ होत असत आणि इतिहास म्हणजे कथा सांगितल्यासारखा शिकवत असत. त्यामुळे हे सर्व शाळेतच पक्क होऊन जात असे. चौथीपर्यंत होमवर्क नसायचा, त्यामुळे घरी आलं की मनसोक्त अंगणात खेळायचं. हीच त्या काळातील अध्यापनपद्धती. विज्ञान प्रयोगशाळा नव्हती; पण आकाश, झाडं, विहीर, शेती-हेच जिवंत प्रयोग होते. परगावावरून येणारी मुलं चटणी-भाकरी- भाजी जे काय असेल ते घेऊन यायचे. एखाद्या मुलाकडे भाकरी नसेल, तर तो उपाशी राहायचा नाही. शाळेत कधीच कोणाशी स्पर्धा नसायची. शाळेच्या ओट्यावर अभ्यास, मैदानात खेळ आणि शिक्षकांचं मार्गदर्शन हे सगळं नकळत आयुष्याचे धडे देऊन जायचे. आज आधुनिक इमारती, स्मार्ट फोन आणि डिजिटल शिक्षण आले आहे. पण ऐंशीच्या दशकातील ग्रामीण प्राथमिक शाळेतील माणुसकी, आपुलकी आणि साधेपणा हे मूल्य आज दुर्मीळ झाले आहे. त्या शाळांनी केवळ अक्षरओळख दिली नाही, तर आयुष्याला दिशा दिली. आजही गावातून जाताना एखादी जुनी शाळा दिसली, की मन नकळत थांबतं... आणि त्या कौलारू छपराखालून उमटलेला प्रार्थनेचा सूर पुन्हा कानात घुमू लागतो. त्या काळात ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी इमारत नव्हती, तर ती गावाच्या सांस्कृतिक, नैतिक आणि भावनिक जडणघडणीचं केंद्र होती.

महाराष्ट्र जीत

**- लता गुठे**

## आत्मबोधाचा शाश्वत आनंद

मातेच्या गर्भात असताना जीवाला स्वस्वरूपाची जाणीव असते . पण गर्भामध्ये " सोहं सोहं " करणारा हा जीव जन्माला आल्यानंतर मात्र त्याला देहबुद्धी प्राप्त होते आणि " कोहं कोहं " असा आक्रोश करायला लागतो. मायेच्या प्रभावामुळे परमात्म्यापासून हा जीव दूर जातो. मी म्हणजे देहच याच भ्रमात तो जीवन जगतो आणि अहं मध्ये बद्ध होतो. स्वताचा अहं कुरवाळण्यात आनंद मानणारा हा जीव या भवसागरातून पार कसा होणार ? मायेत गुरफटलेल्या आणि स्वस्वरूप विसरलेल्या अशा या जीवाला या मायानदीतून पार व्हायचे असेल तर त्याचा उगम ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करायला हवा. सूक्ष्माकडून स्थूलाकडे जाणे हा जरी मायेचा स्वभाव असला तरी त्याच्या प्रभावापासून वाचण्यासाठी नदीच्या प्रवाहा बरोबर वाहत न जाता त्याच्या विरुद्ध दिशेने पोहत जाऊन भगवंता चरणी विलीन होणे हेच अंतिम ध्येय असायला हवे.या मोहरूपी मायेपासून अत्यंत सावधपणे जीवाने स्वत:ला बाजूला नेऊन परमेश्वराचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. आत्मा हाच ईश्वर आहे आणि हे जाणून घ्यायचे असेल तर प्रथम अहंचा त्याग करणे गरजेचे आहे. देहबुद्धी मध्ये अडकलेला जीव कनिष्ठ देवांमध्ये अडकतो अन मुख्य देवापासून दूर राहतो.

मानवी मन हे अत्यंत चंचल आहे पण या मनाचा, प्रवृत्तीचा जर अभ्यास केला तर सत पासून जन्माला आलेले मन मूळात सज्जनच आहे. पण कल्पनेमध्ये रमणारे चंचल मन आपल्या मूळ प्रवृत्ती पासून दूर जाऊन इतर गोष्टींमध्येच रमते. आणि अशाश्वत जगात रमलेले मनच जीवाला शाश्वत सुखापासून दूर ठेवते म्हणून मनालाच उत्तम विचार करायला प्रवृत्त केले पाहिजे. उत्तम विचार, उत्तम संगत, उत्तम चिंतन मननाची सवय लावून परमेश्वर प्राप्ती कशी करुन घ्यावी हे आपल्याला श्रीमद्भगवद्गीता, दासबोध या ग्रंथातून शिकायला मिळते. शुद्धज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मानवी मनावर जो अज्ञानाचा पडदा आहे तो दूर झाला पाहिजे. खरे तर जीव आणि ईश्वर यामध्ये द्वैत नाही पण मायेमुळे जीवाला ईश्वराचे विस्मरण झाले आहे. 'मी म्हणजे देह' आणि माझ्यापेक्षा ईश्वर काही वेगळा हा भ्रम जीवाला झाला. परंतु जीवशिव हे एकरूपच आहेत ही एकरूपत्व जाणून घेण्यासाठी जीवाने भक्तिमार्गाचा अवलंब करावयास हवा.

माणसाला आपल्या मूळ स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असेल तर त्यासाठी मायेचा त्याग करावा लागेल. भगवंताचे कर्तुत्व विलक्षण आहे तसेच ही माया मोठी विचित्र आहे. या मायेमध्ये रमल्यामुळेच माणसाचे मन अस्थिर राहते. माणसाचे मन कायम कल्पनेमध्ये रमून जाते. यामुळे त्याचे मन कधीच एकाग्र होऊ शकत नाही.

मनालाच सतत भगवंताचे चिंतनात रमवायला हवे.

इंद्रियांच्या पातळीवर विषयसुखाचा विचार करत राहते. तेव्हा ती माया माणसाच्या बंधनास अथवा पुनर्जन्मास कारणीभूत ठरते. पण मनातील विचार भगवंतासंबंधीचे असतील तर हळूहळू हेच मन साधकाला निर्विचार करून हीच माया साधकाला बंधनातून मुक्त करण्यास उपयोगी ठरू शकते. त्यासाठी साधकाने एकांतात राहून सतत साधना करणे गरजेचे आहे. अहंकार आणि वासना यामुळे माणूस दृश्य जगातील सगळ्यांना माझे माझे म्हणत राहतो. इतरांकडून अपेक्षा करीत राहतो आणि इतरांच्या अपेक्षापूर्ती करू शकत नाही . अशा या विचित्र चक्रात तो सापडतो आणि या अपेक्षापूर्तीच्या खेळात मनुष्य अधिकाधिक मायेत गुरफटत जातो. या चक्रातून सुटण्यासाठी अहंकाराचा आणि वासनेचा त्याग करायला हवा. देहबुद्धी ते आत्मबुद्धी साध्य करण्यासाठी साधना उपासना याच्या माध्यमातून शाश्वत आनंद प्राप्त करून घ्यायला. सर्व सुखाचा सागर असणा-या भगवंताला आपले सर्वस्व मानले तरच या मनाला खरा शाश्वत आनंद प्राप्त होणार आहे. मन हे सिद्धीचे कारण आहे . मनाच्या प्रसन्नतेवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत हे जाणून तसेच मनाचे सामर्थ्य ओळखून मनाला विवेकाने आवर घालून त्याला रामरूपी करायला हवे तेंव्हाच आत्मबोधाचा शाश्वत आनंद प्राप्त होईल.

महाराष्ट्र जीत

**- अर्चना सरोदे**

# राज्य शेती महामंडळाने उपलब्ध जागेची उपयोगिता निश्चित करुन उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्र जीत

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे सुमारे ३८ हजार एकर जागा उपलब्ध आहे. या जमिनीची उपयोगिता, भविष्यातील नियोजन याबाबत तज्ज्ञ सल्लागारामार्फत सर्वेक्षण करुन जागेचा योग्य उपयोग तसेच महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाची ३३०वी बैठक मंत्रालयात पार पडली. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल रंजन महिवाल, वित्त विभागाचे सहसचिव विवेक दहिफळे, महसूल विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज यांच्यासह महामंडळाचे संचालक यावेळी उपस्थित होते.महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, महामंडळाच्या जमिनी सार्वजनिक हिताच्या कामासाठी देताना रेडीरेकनरच्या दराने देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. महामंडळाच्या बिन शेती प्रयोजनासाठी दिलेल्या जमिनींच्या सुरक्षा ठेव बाबत बँक गॅरंटी आणि प्रथम वर्षाच्या भाड्याच्या दीडशे टक्के सुरक्षा ठेव घेण्याबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देताना भाडे आणि सुरक्षा ठेव किती असावी याबाबत अभ्यास करुन सुरक्षा ठेव वाढविण्याबाबत विचार करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत महामंडळाच्या टिळकनगर मळ्यावरील मौजे कान्हेगांव ता. श्रीरामपूर येथील सौर कृषी वाहिनी योजनेसाठी महावितरणला १७ हे. ८ आर जागा देण्यास मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे महामंडळाच्या श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव मळ्यावरील १५०० एकर जमीन संरक्षण संशोधन आणि विकास



संस्था (डीआरडीओ) यांना देणेबाबत मंत्रिमंडळ उपसमितीसमोर प्रस्ताव ठेवण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले. महामंडळाच्या पुणे येथील कार्यालयाच्या निवासी परिसरात मोडकळीस आलेली इमारत पाडण्यात येऊन या जागेचे व्यावसायिक वापरासाठी नियोजन करण्याची सूचना त्यांनी केली. त्याचप्रमाणे महामंडळाच्या मुख्यालयाच्या परिसरातील रहिवासी इमारतीलगतची रिक्त जागा क्रीडा सुविधांसाठी तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्याबाबत त्याचप्रमाणे शेती महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या वापरासाठी वाहने खरेदी करण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महामंडळाच्या मागील बैठकीतील निर्णयांवर झालेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेतला. त्याचप्रमाणे यापूर्वी झालेल्या सर्व बैठकांमधील निर्णयांचा कार्यपूर्ती अहवाल तयार करण्याचे आदेश दिले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## पंडित दीनदयाळ उपाध्याय पुण्यतिथी निमित्त लासलगाव येथे "समर्पण दिवस" साजरा



महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :** राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री. नितीन नबीनजी यांच्या निर्देशानुसार, लासलगाव भाजपा मंडल तर्फे लासलगाव ..श्री गणेश मंदिर येथे आज ११ फेब्रुवारी २०२६ रोजी भाजपा सरचिटणीस नाशिक जिल्हा उत्तर सौ सुवर्णा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आज समर्पण दिवसाचे आयोजन करण्यात आले. लासलगाव मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे,भाजपा शहराध्यक्ष श्री. शेखर होळकर, उपाध्यक्ष श्री राजेंद्र चाफेकर,ज्येष्ठ नेते दत्तुलालजी शर्मा यांनी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली. सुवर्णा जगताप यांनी आपले मनोगत मांडताना पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एकात्म मानववाद आणि अंत्योदय विचारांचे होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडली..दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन, दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन, दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजना , दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योति योजना, दीन दयाल उपाध्याय अंत्योदय परिवार सुरक्षा योजना या योजना सरकारद्वारे राबविल्या जातात .. यावेळी भाजपा उपाध्यक्ष श्री राजेंद्रजी चाफेकर यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन, योगदान आणि अविभाज्य मानवतावाद यावर आपले विचार मांडले. यावेळी मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे, निलेश जगताप, निलेशबापू लचके, मनीष चोपडा, सचिन लचके, लक्ष्मण खलसे, सोमनाथ गांगुर्डे, अयाज शेख, संतोष राजोळे, कैलास बोराडे, अनिल भावसार, भूपेंद्र दगडे,राजू सुरसे,अयाज शेख,भगवान बोरहाडे,शैलजा भावसार, नंदा शर्मा,रंजना शिंदे, उषा कुमावत, रूपा केदारे, योगिता आंबेकर, मंजुषा केंगे तसेच सर्व भाजपा बूथ प्रमुख, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या 1976 बॅचचे स्नेहसंमेलन

महाराष्ट्र जीत

**मुंबई प्रतिनिधी :** चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या 1976 च्या बॅचचे स्नेहसंमेलन 7 फेब्रुवारी 2026 रोजी शाळेच्या वागळे सभागृहामध्ये संपन्न झाले . भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई साहेब हे देखील या बॅचचे माजी विद्यार्थी नात्याने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाला इजराइल, युरोप, अमेरिका इत्यादी देशातूनही विद्यार्थी आले होते. कार्यक्रमाला त्यावेळच्या त्यांच्या शिक्षिकांना ,सरांना आवर्जून आमंत्रण दिले गेले होते .यातील काही शिक्षक उपस्थित होते परंतु काही वयोमानपरत्वे येऊ शकले नाहीत परंतु त्यांनी चल चित्रांद्वारे आपल्या शुभेच्छा मुलांना पाठवल्या होत्या.

त्या काळात शाळेच्या समोरील हरीचे दुकान हे सगळ्या विद्यार्थ्यांचे आवडते ठिकाण होते. यात दुकानात मिळणारे चिंचा, बोरे, आवळा, बडीशेप, लिंबाच्या गोळ्या लोकप्रिय होत्या. विद्यार्थ्यांनी असा स्टॉलच वागळे सभागृहाच्या बाहेर मांडला होता. सकाळी साडेदहा वाजता माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई



साहेबांचे आगमन झाले .त्यांना शाळेच्या एनसीसी बटालियन तसेच शाळेच्या मुलींच्या बँडच्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर कार्यक्रम सुरू झाला. सर्व माजी विद्यार्थी विद्यार्थिनी अतिशय भावुक झाले होते. त्यांच्या आज हयात नसलेल्या साथीदारांना तसेच शिक्षकांना त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्रद्धांजली वाहिली व नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेचे ब्रीदवाक्य असलेले शीलम परं भूषणम् हे गीत सर्वांच्याच हृदयाला स्पर्श करून गेले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेला माजी विद्यार्थ्यांकडून अत्याधुनिक म्युझिक सिस्टीम भेट देण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे मॅडम यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी जमवलेला एक लाख पंच्याहत्तर हजार रुपयांचा धनादेश चिकित्सक समूहाचे सचिव डॉ गुरुनाथ पंडित सर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. डॉक्टर गुरुनाथ पंडित सर यांनी हा धनादेश बँकेत कायमस्वरूपी ठेव म्हणून ठेवून येणाऱ्या व्याजात तेवढेच व्याज चिकित्सक समूहातर्फे मिळवून येणाऱ्या रकमेतून दर 24 नोव्हेंबरला एका होतकरू विद्यार्थी व विद्यार्थिनीला पुरस्कृत केले जाईल अशी घोषणा केली 24 नोव्हेंबर हा माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई सरांचा वाढदिवस आहे.

शाळेचे विविध उपक्रम सुरू आहेत जसे गतवर्षी 27 फेब्रुवारीला शाळेने केलेल्या जागतिक 1000 गाण्यांचा इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, मुलांना साहित्यिक किंवा कवी बनवण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरता सुरू असलेला अजब गजब या त्रैमासिकाचा उपक्रम, तसेच यावर्षीच्या मराठी भाषा गौरव दिनाला संत साहित्य हा मराठी भाषेचा भक्कम पाया याविषयी होणाऱ्या पुढील कार्यक्रमाबद्दल अवगत केले गेले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. अवधूत गोखले,श्री अविनाश पाठक, श्री नितीन आंबर्डेकर यांनी विशेष सहभाग घेतला श्री. विनायक जोशी यांनी शाळेच्या संदर्भामध्ये सुंदरशी ध्वनि चित्रफीत बनवली.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सौ. जोस्ना म्हात्रे,माधुरी गोखले,सुबोध पालकर,मोहन नारकर राजीव गोविलकर, संजय होनाळे यांनी करमणुकीच्या कार्यक्रमाचे नियोजन खूप उत्कृष्टपणे केलं.

सर्व जुन्या नव्या आठवणींची छानशी सांगड सतीश सराफ यांनी घातली. सर्व मित्र-मैत्रिणींच्या जुन्या आठवणी त्यांनी आपल्या निवेदनात खास करून उल्लेख केल्या.

## ई-केवायसी पूर्ण करण्याची तहसीलदार सुमन मोरे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :** तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना शासनाव्दारे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीसाठी (अवकाळी पाऊस / अतिवृष्टी / अवर्षण /दुष्काळ इ.) निविष्ठा अनुदानाच्या स्वरुपात मदत जाहीर करण्यात येत असते. तालुक्यात सन २०२५ ते २०२६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अवेळी पाऊस/ गारपीट /अतीवृष्टी व वादळी वारे यामूळे शेतकरी यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामूळे शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे शेतीपिकांसाठी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदान ई पंचनामा पोर्टलव्दारे पूर्ण केल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात वाटप करण्यात येते. परंतू आज १ ते २ वर्षाचा कालवधी होवून देखील ६६४८ पेक्षा अधिक ई केवायसी प्रलंबीत असल्याचे दिसून येते. ज्यामूळे शेतकऱ्यांना मुदतीत अनुदानाचे वाटप होत नाही. सदर प्रलंबित ई केवायसी १०० % पूर्ण होणे आवश्यक आहे.

जेणेकरुन संबंधीत शेतकरी यांना अनुदान वितरीत होण्यास सुलभहोईल. त्या अनुषंगाने मंठा तालूक्यातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, तहसिल कार्यालयाकडून सर्व महा ई सेवा

केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र तसेच सेतू सुविधा केंद्र यांना तालुक्यातील ई-केवायसी पेंडींग असणाऱ्या शेतकऱ्यांची यादी पुरविण्यात आलेली असून स्थानिक स्तरावरील कर्मचारी यांना गावामध्ये चावडीवर यादी चिटकवून, दवंडी देऊन, मौखिक तसेच व्हॉटस्ॲपव्दारे माहिती प्रसारीत करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच तहसिल कार्यालयाने गावनिहाय ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ग्राम महसुल अधिकारी / ग्राम पंचायत अधिकारी यांना गावातील ग्रामपंचायत स्तरावर कॅम्प आयोजित करुन ई-केवायसी प्रलंबीत राहिलेल्या शेतकऱ्यांकडून कॅम्प मध्ये उपस्थित राहून केवायसी पूर्ण करून घेण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. तरी शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. जर संबंधीत शेतकरी यांनी विहित मुदतीत ई-केवायसी पूर्ण केली नाही व त्यामुळे तो अनुदानापासून वंचित राहिल्यास त्यास सर्वस्वी सदर शेतकरी जबाबदार राहिल. तरी सर्व शेतकरी बांधवांनी तात्काळ प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करावी व शासनास सहकार्य करावे असे तहसिलदार सुमन मोरे मंठा यांनी आवाहन केले आहे.

## वाशिममध्ये विज्ञानाचा महाकुंभ! कुतूहल प्रदर्शनीने ४० हजार विद्यार्थ्यांना दिली वैज्ञानिक दृष्टिकोनाची नवी दिशा”

महाराष्ट्र जीत

**वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम विज्ञान भारती, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित ‘कुतूहल विज्ञान प्रदर्शनी’ने वाशिम जिल्ह्यात इतिहास घडविला आहे. जिल्हाभरातून जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनीला भेट देत विज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला असून हा जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

दि. ८ फेब्रुवारी रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या समारोपीय कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, आयएमए अध्यक्ष डॉ. वसंत खडतकर, विवस्वान हेंबाळकर, विज्ञान



प्रदर्शनीचे उपाध्यक्ष डॉ. हरीश बाहेती, वाशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा शीलाताई राठी, कुतूहलचे मुख्य समन्वयक रोहित गनोरकर, विज्ञान भारतीचे नरेंद्र सातफळे, विदर्भ कोषाध्यक्ष गिरीश जोशी, शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. शिक्षक व संयोजकांचा सन्मान करण्यात आला. प्रदर्शनीच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. शिस्तबद्ध नियोजन ठेवून सर्वाधिक विद्यार्थी सहभागी करणाऱ्या संस्थांना पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रदर्शनीदरम्यान डॉ. हर्षाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना सीपीआर प्रशिक्षण देण्यात आले.

## श्री संत गाडगेबाबा यांच्या 150 वी जयंती धुमधडाक्यात विविध कार्यक्रमाने साजरी होणार

महाराष्ट्र जीत

**ज्ञानेश्वर काळे** : दर्यापूर तालुक्यातील श्री क्षेत्र सेडगाव श्री राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जन्मभूमी येथे जयंतीनिमित्त धुमधडाक्यात साजरी होणार

कण कण करुनी कोटी केले, कण ही ना खर्चिला स्व हितासाठी, असे निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांची 150वी, जयंती पर्वावर बाबांच्या जन्मभूमी शेंडगावी दि, 23फेब्रुवारी2026रोजी, महाराष्ट्र भुषण, सत्यपाल महाराजांच्या सप्तखंजेरी च्या सप्तसुरात जयंती पर्वावर सुरवात होईल,, त्याच वेळी संत गाडगेबाबा यांच्या संदेशानुरुप आजीवन कार्यरत असलले महाराष्ट्रातील मान्यवराचा,, नवनिर्वाचित नगर सेवकांना बाबांच्या जन्मभूमीत सन्मान करण्यात येईल, सोयरीक,तदनंतर लग्न या जटिल प्रश्नावर एकाच वेळी एकाच ठिकाणी उपवर वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे , या विविध कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील, संत विचारांचे गाढे अभ्यासक, प्रचारक, मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करतील,, अशा विविध कार्यक्रमचा लाभ घ्यावा, असे आवाहन,, डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र, तथा संत गाडगेबाबा वशंज जानोरकर परिवार, करीत आहेत,, श्री संतोष रामेकर, भामोद, दर्यापूर तालुका प्रमुख, खास प्रचाराची धुरा सांभाळत सर्व क्षेत्रातील समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी हि विनंती.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेलमध्ये अभिवादन

महाराष्ट्र जीत

**पनवेल (प्रतिनिधी) :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषद सदस्या कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, कामगार नेते रवी नाईक, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अंकुश पाटील, के.सी. पाटील, विश्वजित पाटील, यतीन पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पंडित



दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी उपाध्याय यांच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या एकात्म मानवतावादाच्या तत्त्वज्ञानाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे प्रमुख नेते, विचारवंत व तत्त्वज्ञ होते. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक होते आणि पुढे भारतीय जनसंघाच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी मांडलेले ‘एकात्म मानवतावाद’ हे तत्त्वज्ञान त्यांच्या विचारसरणीचे केंद्रबिंदू मानले जाते. या तत्त्वज्ञानात भारतीय संस्कृतीवर आधारित सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा विचार मांडण्यात आला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा ‘अंत्योदय’ हा त्यांचा मुख्य विचार होता. १९६७ साली ते भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांचे विचार आणि कार्य आजही भारतीय जनता पक्षाच्या धोरणांमध्ये आणि कार्यपद्धतीत प्रतिबिंबित होताना दिसतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेची भावना यांसाठी ओळखले जातात.

## जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा शाळेने पटकाविला द्वितीय क्रमांक

महाराष्ट्र जीत

शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये अत्यंत हिरीरी ने भाग घेणारी, व मागील वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त करणारी शाळा म्हणजे दुधा शाळा या शाळेने 'जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा 2025-26' या अंतर्गत झालेल्या जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील



विद्यार्थ्यांनी पटकाविला दुसरा क्रमांक. यामध्ये सार्थक रामेश्वर खुळे,

भाग्यश्री गोकुळ शिंदे व स्नेहल संजय जाधव या इयत्ता 8 वीच्या तिन्ही विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये विचारलेल्या अचूक प्रश्नांची उत्तरे देऊन प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर सहशिक्षक श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य व ग्रामपंचायत कार्यालय तसेच सर्व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अनसिंग फाट्यावरील उघड्यावर अनधिकृत व विनापरवाना मास विक्री बंद करण्यात यावी – सामाजिक कार्यकर्ते अनिल ठाकरे अनसिंग

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम :** अंनासिंग हे वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या अनसिंग येथे श्री शृंगऋषी महाराज संस्थान असून ही नगरी धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जाते. श्री शृंगऋषी महाराज, श्री गजानन महाराज मंदिर, साईबाबा मंदिर तसेच दत्त मंदिर अशा अनेक धार्मिक संस्था येथे कार्यरत असून महाशिवरात्री निमित्त दरवर्षी हजारो भाविक संतांच्या दर्शनासाठी अनसिंग येथे येत असतात. अशा पवित्र शृंगऋषी नगरीच्या प्रवेशद्वारावरच



व मुख्य रस्त्यालगत अनधिकृत व विनापरवाना उघड्यावर सुरू असलेल्या मास विक्रीकडे संबंधित अधिकारी वर्गाने अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप तक्रारदार सामाजिक कार्यकर्ता अनिल ठाकरे यांनी केला आहे. भाविक ज्या मार्गाने मंदिर परिसरात प्रवेश करतात, त्याच मार्गावर खुलेआम अनादी कृत व विना परवाना मास कापणी व विक्री सुरू असल्याने धार्मिक भावना दुखावल्या जात असून परिसराच्या पावित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या संदर्भात तक्रारदार सामाजिक कार्यकर्ता अनिल ठाकरे यांनी ग्रामपंचायत शेलू सापळी उमराळा येथील सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे अनेक वेळा तोंडी व लेखी स्वरुपात तक्रारी केल्या, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे संतांच्या नगरीत सुरू असलेली ही अनाधिकृत व कुठलाही परवाना नसताना उघड्यावरील मास विक्री तातडीने बंद करून विक्रेत्यांना अधिकृत जागेत स्थलांतरित करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# उघड्या खिडकीत चोरट्यांचा हात; बोईसरमधून ७५ हजारांहून अधिक किमतीचे मोबाईल लंपास

**पालघर :** पालघर तालुक्यातील बोईसर जवळील सरावली परिसरात असलेल्या लक्ष्मी नारायण अपार्टमेंटमध्ये उशिरा रात्री चोरीची घटना घडली असून या प्रकारामुळे नागरिकांच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अज्ञात चोरट्याने उघड्या खिडकीतून हात घालून तब्बल ७५,५०० रुपयांच्या मोबाईल फोनची चोरी केल्याची माहिती समोर आली आहे.

रूम क्रमांक २०८ मध्ये राहणारे संजीव बाल रेड्डी (वय ४४) हे मोबाईलवर रील्स पाहता पाहता झोपले. त्यांनी आपला सुमारे ५० हजार रुपये किमतीचा सॅमसंग एस-२३ मोबाईल उघड्या खिडकीजवळ ठेवला होता. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने खिडकीतून हात घालून मोबाईल लंपास केला.त्याच इमारतीत राहणारे रमेश जियालाल गौतम यांचा १०,५०० रुपयांचा रियलमी ३३ आणि राकेश जियालाल गौतम यांचा १५,००० रुपयांचा रियलमी ५५ मोबाईलही चोरीला गेला. या तिन्ही मोबाईलची एकूण किंमत ७५,५०० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी बोईसर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३०५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमण प्रकरणी बोईसरचे सरपंच दिलीप धोडी यांच्याभोवती अर्नहतेचा फार्स आवळला

**पालघर :** बोईसर ग्रामपंचायतीचे सरपंच दिलीप यशवंत धोडी यांच्या विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४ (ज) (३) अन्वये सरपंच पद अर्नहतेची कारवाई प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शासकीय जमिनीवरील अतिक्रमण प्रकरणी बोईसर सरपंच दिलीप धोडी यांच्याभोवती अर्नहतेचा फार्स आवळला जाणार आहे



शासकीय जमीन किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्याला पंचायतीच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरविण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांच्याकडे यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते अमृत प्रकाश धोडी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, दिलीप धोडी यांच्या पत्नी दिपा रामचंद्र भोईर उर्फ दिपा दिलीप धोडी तसेच त्यांच्या मुली प्रिती दिलीप धोडी आणि अलका दिलीप धोडी यांनी विकासकांसोबत संगनमत करून मौजे बोईसर येथील गट क्र. २७/१ ते ६५/१३, प्लॉट क्र. २० (क्षेत्र ०.६६.०० आर) या शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकाम केल्याचा आरोप आहे.

या बांधकामामुळे सरकार तसेच सदनिकाधारकांची फसवणूक झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी गटविकास अधिकारी, पालघर यांनी केलेल्या सखोल चौकशी अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

**बनावट दाखल्याचा चौकशीत खुलासा**

शासकीय जागेवरील २४ सदनिका आणि १२ गाळ्यांचे अनधिकृत बांधकाम अधिकृत ठरविण्यासाठी सरपंच दिलीप धोडी यांनी ग्रामपंचायत लेटरहेडवर १५०२ जावक क्रमांकाचा दाखला तयार केला होता. मात्र हा दाखला बनावट असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी कमलेश संखे आणि तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंकेश संखे यांनीही आपल्या जबाबात याची पुष्टी केल्याचे समोर आले आहे.

# व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण?



फेब्रुवारीचा महिना आला की हवेत एक वेगळीच ऊब पसरते. गुलाबांची पाकळी, चॉकलेट्सची गोडी, शब्दात न मावणाऱ्या भावना आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं. या साऱ्यांचा एकत्रित उत्सव म्हणजे व्हॅलेंटाईन डे. काहींसाठी तो फक्त एक दिवस असतो पण अनेकांसाठी तो संपूर्ण आयुष्याची आठवण करून देणारा क्षण असतो. प्रेम म्हणजे केवळ गुलाब, कार्ड्स आणि सोशल मीडियावरचे स्टेटस नाही, तर तो माणसाच्या अस्तित्वाचा आत्मा आहे, जो श्वासासोबत आत जातो आणि नात्यांमधून बाहेर प्रकट होतो. प्रेम हे कोणत्याही एका दिवसापुरते मर्यादित नसते. तरीही व्हॅलेंटाईन डे चे महत्त्व नाकारता येत नाही. कारण हा दिवस आपल्याला थांबवतो धावपळीच्या, स्वार्थी, स्पर्धात्मक जगात थोडा वेळ स्वतःकडे आणि आपल्या माणसांकडे पाहायला भाग पाडतो. "आपण प्रेम करतो का?" यापेक्षा "आपण प्रेम व्यक्त करतो का?" हा प्रश्न या दिवशी अधिक ठळक होतो.

आजच्या काळात प्रेमालाही बाजारपेठेचा रंग चढला आहे. गिफ्ट्सची किंमत, रेस्टॉरंट्सचे पॅकेजेस, सोशल मीडियावरील 'परफेक्ट कपल' फोटो या सगळ्यात प्रेम हरवत चालले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण प्रेम कधीच वस्तू नव्हते आणि कधीच होणार नाही. प्रेम म्हणजे दोन माणसांमधील न दिसणारा करार एकमेकांना समजून घेण्याचा, स्वीकारण्याचा आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देण्याचा. भारतीय संस्कृतीत प्रेमाला नेहमीच गहिरे, शांत, संयमी रूप दिले गेले आहे. सावित्रीचे सत्यवानावरील प्रेम, राधा-कृष्णाची अध्यात्मिक जवळीक, मीरा आणि विठ्ठलाचे भक्तिपूर्ण नाते ही प्रेमाचीच विविध रूपे आहेत. आज मात्र प्रेमाला फक्त रोमँटिक चौकटीत अडकवले जाते. प्रत्यक्षात प्रेम हे आईच्या काळजीत असते, वडिलांच्या न बोलणाऱ्या त्यागात असते, मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असते आणि वृद्धांच्या डोळ्यातल्या शांततेत असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेमाचा हा व्यापक अर्थ पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे. प्रेम म्हणजे केवळ 'तू माझा किंवा माझी' एवढेच नव्हे, तर 'मी तुझ्यासाठी आहे' हे निःस्वार्थी भावनेतून उमटलेले वाक्य आहे. प्रेमात अधिकार असतो, पण मालकी नसते. प्रेमात अपेक्षा असतात, पण अटी नसतात. प्रेमात राग असतो, पण तोही जपणुकीचा असतो. आजच्या तरुणाईवर अनेकदा प्रेमाबाबत आरोप केले जातात की ते उथळ आहे, क्षणिक आहे, दिखाऊ आहे. पण सत्य असे आहे की आजची पिढी प्रेम व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहे. त्यांच्या भाषेत प्रेम आहे, त्यांच्या संगीतामध्ये प्रेम आहे, त्यांच्या कविता आणि मेसेजेस मध्ये प्रेम आहे. दोष प्रेमाचा नाही, तर प्रेम समजून न घेणाऱ्या समाजाचा आहे. प्रेमाला विरोध करणारे अनेक आवाज आजही समाजात आहेत.

व्हॅलेंटाईन डे म्हणजे 'पाश्चात्त्य संस्कृती' असा शिक्का मारून प्रेम व्यक्त करणाऱ्यांना दोषी ठरवले जाते. पण प्रेमाला संस्कृती नसते; प्रेम ही माणसाची मूलभूत गरज आहे. संस्कृती जर प्रेमाला नाकारत असेल, तर त्या संस्कृतीला पुन्हा तपासण्याची गरज आहे. प्रेम हे बंडखोर असते ते जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती या सगळ्या भिंती ओलांडते. म्हणूनच कदाचित प्रेमाला नेहमीच विरोध झाला आहे. कारण प्रेम प्रश्न विचारते, रूढी मोडते आणि माणसाला माणूस म्हणून उभे करते. व्हॅलेंटाईन डे हा त्या बंडखोरीचा शांत, सुंदर उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात नात्यांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. मोबाईलमध्ये हजारो संपर्क असले तरी मनात जवळीक कमी होत आहे.

अशा वेळी व्हॅलेंटाईन डे आपल्याला आठवण करून देतो की, प्रेमासाठी वेळ काढावा लागतो, संवाद साधावा लागतो, आणि कधी कधी स्वतःला बाजूला ठेवावे लागते. खरे प्रेम मोठ्या शब्दांत व्यक्त होत नाही; ते छोट्या कृतींमध्ये दिसते. थकलेल्या जोडीदारासाठी केलेला चहा, मित्राच्या अपयशात दिलेली शांत साथ, आई-वडिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारी एक साधी भेट, हेच प्रेमाचे खरे क्षण आहेत. व्हॅलेंटाईन डे हा अशा क्षणांची उजळणी करण्याचा दिवस आहे. आज प्रेमालाच टिकून राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो. नाती तुटतात, विश्वास ढासळतो, आणि लोक एकमेकांपासून दूर जातात. पण तरीही प्रेम संपत नाही. कारण प्रेम हे शेवटी आशेवर उभे असते "उद्या सगळं बरं होईल" या विश्वासावर. व्हॅलेंटाईन डे हा त्या आशेचा उत्सव आहे. प्रेम हे परिपूर्ण नसते. त्यात चुका असतात, मतभेद असतात, वेदना असतात. पण तरीही प्रेम सोडून देण्यापेक्षा त्याला समजून घेणे महत्त्वाचे असते. प्रेम म्हणजे प्रत्येक वेळी जिंकणे नाही, तर कधी कधी हरूनही एकत्र राहणे असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने समाजाने एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, प्रेमाला स्वीकारले तरच माणुसकी टिकेल. द्वेष, हिंसा, असहिष्णुता यांच्यावर मात करण्याची ताकद फक्त प्रेमात आहे. प्रेमाशिवाय कोणतीही क्रांती टिकू शकत नाही, कोणतीही संस्कृती फुलू शकत नाही. आज गरज आहे ती प्रेमाला मोकळा श्वास घेऊ देण्याची. प्रेम करणाऱ्यांना प्रश्न विचारण्याऐवजी त्यांना समजून घेण्याची. कारण प्रेम दडपले गेले की ते वेदनेत बदलते, आणि स्वीकारले गेले की ते जीवनात बदल घडवते. व्हॅलेंटाईन डे म्हणजे फक्त प्रेमींचा दिवस नाही; तो माणसाचा दिवस आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक नात्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, प्रेम व्यक्त करण्याचा आणि थोडे अधिक माणूस होण्याचा दिवस आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, प्रेम नेहमी जवळ असतेच असे नाही. कधी ते अंतरात असते, कधी आठवणीत, कधी न बोललेल्या शब्दांत. विरह म्हणजे प्रेमाचा अभाव नसतो; तो तर प्रेमाचीच सर्वात प्रामाणिक परीक्षा असते. ज्याची ओढ लागते, ज्याची आठवण मनाला थकवते आणि तरी ही ज्याच्यासाठी मन प्रार्थना करत राहते, तेच खरे प्रेम. काही प्रेमकथा हातात हात घालून पूर्ण होतात, तर काही डोळ्यांत पाणी ठेवून अपूर्णच राहतात. पण अपूर्णततेही जे जिवंत राहते, जे काळाच्या ओघातही मनात सलत राहते, तेच प्रेम अमर असते. कारण प्रेम मिळण्यात नसते; ते थांबण्यात, वाट पाहण्यात आणि आठवणी जपण्यात असते. व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबामागे कधी कधी एक न बोललेली हुरहूर असते, चॉकलेटच्या गोडीमागे एखादी न व्यक्त झालेली वेदना असते. तरीही माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो, कारण विरहही सांगून जातो की, आपण कुणावर तरी मनापासून प्रेम केले होते.

प्रेम जवळ असो वा दूर, समोर असो वा आठवणीत ते जर खरं असेल तर ते मनाला अधिक माणूस बनवतं आणि म्हणूनच, प्रेम हरवले तरी त्याची आठवण जपा; कारण काही नाती आयुष्यात साथ देत नाहीत, पण आयुष्यभर अर्थ देऊन जातात. प्रेमाला एक दिवस पुरेसा नसतो, पण एक दिवसही निरर्थक नाही. कारण कधी कधी एक दिवसच आयुष्यभराची दिशा ठरवतो. प्रेम करा, व्यक्त करा आणि जपा, कारण प्रेम हेच खरं शाश्वत सत्य आहे. तुमचं आयुष्य प्रेमाने, आपुलकीने आणि सुंदर नात्यांनी नेहमी फुलत राहो, भावनांना शब्द मिळोत आणि शब्दांना अर्थ. व्हॅलेंटाईन डे च्या मनापासून शुभेच्छा!

**प्रेम करा...**


जुळले नाही तरी चालेल,<br>
भेट झाली नाही तरी चालेल—<br>
पण मनातलं प्रेम खोटं ठरू देऊ नका.<br>
कारण विरहातही जे उजळतं,<br>
तेच खरं, शाश्वत प्रेम असतं.



प्रवीण बागडे

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट



यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.



श्याम ठाणेदार

# हिंद दी चादर : गुरु तेग बहादुर यांचे ३५० वर्षांचे बलिदान पर्व

भारतीय इतिहासात धर्म, मानवता आणि स्वातंत्र्य या मूल्यांसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या महान विभूतींमध्ये नववे शीख गुरु 'हिंद-दी -चादर' गुरु श्री तेग बहादुर साहिब यांचे स्थान मानाचे आहे. त्यांनी केवळ शीख धर्माचेच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीचे रक्षण केले. म्हणूनच इतिहासाने त्यांना "हिंद दी चादर" ही गौरवशाली उपाधी दिली. मानवधर्माच्या अस्मिता, आदर्शाच्या मूलमंत्राला चिरंजीवी करण्यासाठी त्यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानासाठी जगाने त्यांना शतकानुशतके आठवणीत ठेवले आहे. भारतीय इतिहासात धर्मांतराचा मोठा प्रभाव आहे. मात्र धर्मांतराच्या विरोधात सर्वोच्च बलिदान देत संस्कृती आणि परंपरांना टिकविण्यासाठी विपरीत परिस्थितीत त्यांनी दिलेला संदेश व त्यासाठी केलेले सर्वोच्च बलिदान भारताने आपल्या इतिहासात सुवर्णपान म्हणून जपले आहे. तत्कालीन व्यवस्थेत कितीही दबाव अन्याय, अत्याचार झाला तरी धर्मांतर न करण्याचा संदेश या सर्वोच्च बलिदानाने समाजात रुजवला.

**"हिंद दी चादर" का म्हणतात?**

मुघल सम्राटाच्या काळात संस्कृती नष्ट करण्यासाठी नागरिकांवर अन्याय होत असे, अशा परिस्थितीत नागरिकांनी श्री गुरू तेग बहादुर यांच्याकडे मदतीसाठी धाव घेतली. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, प्राणाची आहुती दिली तरी संस्कृती सोडणार नाही. परकीयांच्या शक्तीपुढे गुरू तेग बहादुर कदापि झुकले नाही. या भूमिकेतून त्यांनी संपूर्ण भारतासाठी स्वतःचे जीवन तत्कालीन व्यवस्थेत कवचासारखे पुढे केले. म्हणून ते राष्ट्राचे संरक्षण करते म्हणजेच 'हिंद- दी- चादर' झाले.

**गुरु तेग बहादुर यांची शहीदी**

इ.स. 1675 मध्ये मुघल सम्राटाने त्यांच्या भूमिकेचा विरोध करत त्यांना दिल्लीला बोलावले. मात्र श्री गुरू तेग बहादुर आपल्या मतावर ठाम राहिले. त्यांना अनेक कठोर छळाला सामोरे जावे लागले. त्यांची साथ देणाऱ्या त्यांच्या तीन शिष्यांना, म्हणजेच भाई मती दास – भाई सती दास – भाई दयाला –यांना अतिशय अमानुषपणे ठार मारण्यात आले.

अशा अमानुष अत्याचारांनंतरही गुरु तेगबहादुर आपल्या श्रद्धेवर ठाम राहिले. अखेरीस चांदणी चौक, दिल्ली येथे 11 नोव्हेंबर 1675 रोजी त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. जगात या बलिदानाला श्रद्धापूर्वक सर्वोच्च बलिदान संबोधले जाते.

**बलिदानामागील परिस्थिती**

गुरु तेग बहादुर यांचे बलिदान हे कोणत्याही राजकीय सत्तेसाठी नव्हे, तर धर्मस्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी होते. अधिकृत संदर्भ ग्रंथांमध्ये गुरु तेगबहादुर यांचे बलिदान धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान म्हणून नोंदवले गेले आहे. त्यांच्या बलिदानानंतर त्यांचे अंत्यसंस्कार विविध समुदायातील नागरिकांनी स्वत:चा जीव संकटात टाकून पूर्ण केले. त्यामुळे शीख समुदायासोबतच शीख, सिकलगीर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव, उदासिन अशा अल्पसंख्याक समुदायाच्या कार्य कर्तृत्वालाही या शहिदी समागमात सन्मानित करण्यात येत आहे.

**350 व्या शहीदी समागमाचे आयोजन**

महाराष्ट्र शासनाने गुरु तेग बहादुर साहिब यांचे हे सर्वोच्च बलिदानाला लक्षात घेऊन त्यांच्या 350 व्या शहिदी वर्षाला स्मरून त्यांच्या या सर्वोच्च बलिदानाला नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी शहीदी समागमाचे आयोजन केले आहे.

इ.स. 2025 हे वर्ष गुरु तेगबहादुर साहिब यांच्या 350 व्या शहीदी समागाम वर्षाचे आहे. या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राज्यस्तरीय "350 वा शहीदी समागम" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरु तेग बहादुर यांचे विचार समाजापर्यंत पोहोचवणे ,धार्मिक सलोखा, संविधानिक मूल्ये व मानवतावाद अधोरेखित करणे,अल्पसंख्यांक समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे. युवा पिढीला बलिदानाची प्रेरणा देणे हा यामागील उद्देश आहे. नागपूर, नांदेड येथे झालेल्या कार्यक्रमात लाखोने भाविक उपस्थित होते. नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा आहे.

**शीख व इतर समाजांचे महत्त्व**

या महोत्सवात शीख, सिकलगीर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल या समाजांचा विशेष सहभाग आहे, कारण गुरु तेगबहादुर यांच्या संघर्षात हे समाज ऐतिहासिकदृष्ट्या सहभागी राहिले. धार्मिक सहिष्णुतेचा वारसा जपण्याची परंपरा या समाजांमध्ये आहे. महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक संस्कृतीची विविधता या माध्यमातून अधोरेखित होते. विशेषतः सिकलगीर शीख समाजाचा महाराष्ट्रातील ऐतिहासिक प्रवास या कार्यक्रमातून नव्याने समोर येतो.

गुरु तेगबहादुर साहिब यांचे बलिदान हे केवळ शीख इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय संस्कृतीचे वैभव आहे. अन्यायाच्या विरोधात उभे राहून त्यांनी जो आदर्श घालून दिला, तो आजही संविधानिक भारताच्या आत्म्याशी सुसंगत आहे.

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला ३५० वा शहीदी समागम हा इतिहासाची उजळणी करणारा आणि भविष्याला दिशा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. आतापर्यंत नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ ला शहीदी समागम झाले २४,२५ जानेवारीला नांदेड येथे शहीदी समागम कार्यक्रम झाला. त्यानंतर नवी मुंबई येथे हा कार्यक्रम २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी होणार आहे. देश विदेशातील शिखधर्मीय तसेच सर्व समुदायाचे नागरिक यामध्ये लोखोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत.

**-प्रवीण टाके, उपसंचालक(माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**